दै. सत्यप्रभा दि. ९.०२.२५

## हिमायतनगर ठाण्याला एसपी अबिनाश कुमार यांची भेट



**हिमायतनगर दि. ८–** हिमायतनगर पोलीस ठाण्याला शनिवारी सायंकाळी जिल्हाचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी धावती भेट दिली. यावेळी हिमायतनगर (वाढोणा) येथे दिनांक २४ फेब्रुवारी ते १२ मार्च दरम्यान आयोजित श्री परमेश्वराच्या महाशिवरात्री यात्रा उत्सव काळात चोख पोलिस बंदोबस्त देण्यात यावा अशा मागणीचे निवेदन व यात्रा उत्सव पत्रक श्री परमेश्वर मंदिर ट्रस्ट कमिटी व ग्रामस्थांनी दिले आहे.

दि.२४ फेब्रुवारी ते १२ मार्च दरम्यान आयोजित श्री परमेश्वराच्या महाशिवरात्री यात्रा उत्सव सोहळा आहे या पार्श्वभूमीवर श्री परमेश्वर मंदिर ट्रस्ट कमिटीचे उपाध्यक्ष महावीरचंद श्रीश्रीमाळ, सेक्रेटरी अनंता देवकते, संचालक अनिल मादसवार, संजय माने, विलास वानखेडे, पोलीस निरीक्षक अमोल भगत व ग्रामस्थांनीं पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची भेट घेतली यावेळी अबिनाश कुमार यांनी यात्रा काळात दरवर्षीप्रमाणे बंदोबस्त ठेऊन महिला, मुली व जेष्ठांना अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी. शहर व तालुका परिसरातील कायदा सुव्यस्था अबाधित ठेवण्यासाठी ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बारीक लक्ष ठेऊन कायद्याचा बडगा उगारावा अश्या कडक सूचना पोलीस निरीक्षक अमोल भगत यांना दिल्या आहेत तसेच पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा आढावा घेतला आहे.

दै. प्रजावाणी दि. ०९.०२.२५

### जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांची ग्वाही

# किनवट पोलीस ठाण्यात मनुष्यबळ वाढविण्यासाठी प्रयत्न करू

वार्ताहर ● किनवट



वाढत्या लोकसंख्येसोबतच किनवट पोलीस ठाण्यातंर्गत गुन्हेगारीचा आलेखही वाढत आहे, येथील पोलीस ठाण्यात पुरेसे मनुष्यबळ देण्यासाठी आपण निश्चितपणे प्रयत्न करू, अशी ग्वाही जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी शनिवारी दि. ७ येथे दिली.

शासकीय सेवा व योजनांच्या महाशिबीराच्यानिमित्ताने पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार शनिवारी किनवटला आले होते. शिबीरानंतर त्यांनी पोलीस ठाण्याला भेट देवून आढावा घेतला. यावेळी पत्रकारांशी त्यांनी शहरातील कायदा-सुव्यवस्थेबाबत चर्चा करून समस्या जाणून घेतल्या.

अबिनाशकुमार पुढे म्हणाले की, सर्वच पोलीस ठाण्यांत अपुरे मनुष्यबळ आहे.मनुष्यबळ अपुरे असले, तरी शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे हे पोलिसाचे कर्तव्यच आहे. गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिसांचा कायम दरारा असला पाहिजे. गुन्हेगारांचा नायनाट करण्यासाठी सर्वच अवैध धंदे चालकांवर कठोर कारवाई करा, असे आदेश यावेळी त्यांनी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना दिले. पुरेसे कर्मचारी आणि पोलीस वसाहतीसाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

पोलीस, सेना व राज्य राखीव दलात भरती वाढण्यासाठी युवकांना प्रोत्साहित करावे लागणार असून, त्यासाठी विविध ठिकाणी शिबिरे घेण्याचा मानस त्यांनी बोलून दाखविला. विना परवाना ऑटो तसेच बेशिस्त वाहनचालकांसह शाळा, महाविद्यालयांजवळ फिरणाऱ्या टारगटांचा बंदोबस्त करण्याचे आदेश यावेळी त्यांनी दिले. तत्पूर्वी पोलीस अधीक्षकांनी पोलीस ठाण्यातंर्गतच्या पोलीस पाटलांची बैठक घेवून रेती, मुरुम तस्करी रोखण्याबाबत करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे, पोलीस निरीक्षक देविदास चोपडे उपस्थित होते.